महाराष्ट्र शासन - आरोग्य विभाग

**नोदणीकृत कार्यालयः-**
**राज्य क्षयरोग नियंत्रण व प्रशिक्षण केंद्र, पुणे**
पुणे उरो रुग्णालय इमारत, (पहिला मजला) एस.टी.डी.सी पुणे-४११०२७ महाराष्ट्र
दूरध्वनी क्रमांक-०२०-२७२८१९०८ Email Id- stdcmh2@rntcp.org


| | |
|---|---|
| **डॉ.अनिरुध्द देशपांडे**<br>मुख्य वैद्यकिय अधिकारी तथा संचालक | जा.क्र.एसटीडीसी-पुणे/इंटरएक्टिव्ह पॅनल दुरुस्ती/ 2265 /२०२४<br>दिनांकः १०-१२-२०२४. |

## नोटीस

विषयः- इटंरएक्टिव्ह पॅनलची दुरुस्ती करणेबाबत ....

राज्य क्षयरोग नियंत्रण व प्रशिक्षण केंद्र पुणे या कार्यालयातंर्गत असलेल्या प्रशिक्षण विभागातील असलेले इटंरएक्टिव्ह पॅनलची दुरुस्तीअंतर्गत खालील स्पेअरपार्टची खरेदी करवयाची आहे. तसेच इंटरनेट कनेक्शन वाढविण्यासाठी खालील साहित्याची आवश्यकता आहे. याबाबत आपले दर खालील तपशिलाप्रमाणे सिलबंद दरपत्रकामध्ये कार्यालयास पाठवावे, ही विनंती.

दरपत्रकामध्ये नमूद केलेले दर हे सर्व कर व वाहतूक खर्चासह असावेत.

| Sr. No. | Item Specification | Rate (Rs.) per Item |
|---|---|---|
| | Smart interactive flat panel repairing<br>Make – Gladwin<br>Size – 65" | |
| 1 | Main PCB Board | |
| 2 | Fixing and software installation | |
| 3 | UPS 1000 VA | |
| 4 | Router 300mbps | |
| 5 | Networking rack | |
| 6 | HDMI Splitter 1 in 4 out | |
| 7 | HDMI Cable | |
| 8 | Labor Charges | |

उक्त तपशिलामध्ये नमुद केल्याप्रमाणे आपले दरपत्रक सीलबंद लिफाप्यात दिनांक १६/१२/२०२४ पर्यंत (७ दिवस) या कार्यालयास स्वहस्ते / पोस्टाने कार्यालयीन वेळेत दुपारी ३ वाजेपर्यंत सादर करण्यात यावे. त्यानंतर सादर करण्यात आलेल्या दरपत्रकाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच सदरची दरपत्रके त्याच दिवशी शक्यतो दुपारी ४ वाजता समितीसमोर उघडण्यात येतील.

## दरपत्रक सादर करताना मार्गदर्शक सूचना

१) दरपत्रके पुरवठादाराच्या लेटर हेडवरच सादर करावे. लेटर हेडवर आपल्या संस्थेचा शिक्का व सही असणे बंधनकारक आहे.

२) **दरपत्रकातील दरांची तुलना करताना सर्व वस्तूंच्या दरांची बेरीज विचारात घेण्यात येईल. यामध्ये ज्या दरपत्रकधारकांची दरांची एकूण बेरीज कमी असेल त्या दरपत्रधारकास आदेश निर्गमित करण्यात येतील.**

३) दरपत्रकामध्ये नमूद केलेले दर हे सर्व कर व वाहतूक खर्चासह असावेत.

४) दरपत्रकावर जीएसटी क्रमांक व पॅन नंबर यांचा उल्लेख असावा.

५) दरपत्रकासोबत जीएसटी रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र व पॅन कार्डची छायांकित प्रत जोडावी.

६) दरपत्रके उघडतेवेळी इच्छुक पुरवठादार उपस्थित राहू शकतात.

७) ई-मेल मार्गाने सादर केलेल्या दरपत्रकांचा स्वीकार केला जाणार नाही.

८) दरपत्रकामध्ये नमूद केलेले दर हे अटी व शर्तीसह असल्यास दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही.

९) दरपत्रकात नमूद केलेले दर हे उपलब्ध बाजार भावापेक्षा जास्त नसावे.

१०) दरपत्रकामध्ये खाडाखोड केल्याचे आढळल्यास सदर दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही.

११) विहीत मुदतीत सादर न केलेले दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही.

१२) पुरवठादाराने फक्त एकच दरपत्रक सादर करावे.

१३) दरपत्रकामध्ये सादर केलेले दर हे एका वर्षासाठी ग्राहय धरण्यात येतील. यामध्ये वाढ किंवा घट करता येणार नाही.

१४) दरपत्रके स्विकारणे अथवा पुर्णतः नाकरण्याचा पूर्ण अधिकार मुख्य वैद्यकीय अधिकारी, राज्य क्षयरोग नियंत्रण व प्रशिक्षण केंद्र पुणे यांनी राखुन ठेवले आहेत.

१०/१२/२४

मुख्य वैद्यकीय अधिकारी
राज्य क्षयरोग नियंत्रण व प्रशिक्षण केंद्र पुणे

प्रत : - सदर प्रत कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्दीकरिता